# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष-३

■ अंक-२३

दिवा न्यूज

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ८ जानेवारी २०२४ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# १३ जानेवारीला उद्धव ठाकरे दिव्यात

## शाखा भेटी दरम्यान सामान्य शिवसैनिकांशी साधणार संवाद!



**दिवा:-** शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे १३ जानेवारीला दिव्यात येणार असल्याची माहिती आहे. कल्याण लोकसभेतील शाखा भेटी दरम्यान ते शिवसैनिकांशी संवाद साधणार आहेत. आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ॲक्शन मोडवर आले असून सध्या त्यांच्या पक्षात विविध पक्षप्रवेश सुरू आहेत.१३ तारखेला उद्धव ठाकरे कल्याण लोकसभेच्या मतदारसंघात शिवसेनेच्या शाखाना भेटी देणार असून यादरम्यान ते सामान्य शिवसैनिकांशी संवाद साधणार असल्याची माहिती आहे. कल्याण लोकसभेच्या दौऱ्या दरम्यान उद्धव ठाकरे दिव्यातील शिवसैनिकांना देखील भेटणार असल्याने निष्ठावंत ठाकरे सैनिकांत उत्साहाचे वातावरण आहे.

# युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना यंदाचा 'संसद रत्न' पुरस्कार

**१७ व्या लोकसभेतील कामगिरीचा गौरव, सर्वोत्कृष्ट पाच सदस्यांमध्ये समावेश**



**ठाणे:** महाराष्ट्रातील कल्याण लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे युवा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांना यंदाचा संसद रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकसभेतील उत्कृष्ट कामगिरीवरून संसद रत्न पुरस्कार देण्यात येतो. कल्याण लोकसभा मतदारसंघांमध्ये विकासाचा वेगळा पॅटर्न राबवणारे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे लोकसभेतही सर्वच कामकाजात सहभाग घेत असतात. त्यांच्या याच कौतुकास्पद कामगिरीवरून यंदाचा पुरस्कार डॉ. शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे १७ व्या लोकसभेतील सर्वोत्कृष्ट कामगिरी असलेल्या पाच सदस्यांपैकी एक ठरले आहेत. २०१९ ते २०२३ या कार्यकाळात डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ५५६ प्रश्न उपस्थित केले आहेत. ६७ चर्चांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे आणि १२ खाजगी विधेयक त्यांनी मांडली आहेत.

१९९९ या वर्षात स्थापन झालेल्या प्राईम पॉइंट फाऊंडेशन या एनजीओला डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी संसद रत्न पुरस्काराबाबत सूचना केल्या होत्या. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सांगण्यावरून २०१० पासून लोकसभेतील आणि राज्यसभेतील सदस्यांना त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल संसद रत्न पुरस्कार देण्यात येतो. दरवर्षी संसद रत्न पुरस्कार प्रदान केला जातो . तर संसद महा रत्न पुरस्कार दर पाच वर्षातून एकदा दिला जातो. केंद्रीय मंत्री, निवडणूक आयोगाचे माजी सहसंचालक यांसारखे अनेक सदस्य या पुरस्कारासाठी नावांची शिफारस करत असतात. हा एक प्रकारचा नागरिक सन्मान समजला जातो. लोकसभा आणि राज्यसभा यातील कामकाजामध्ये घेतलेला सहभाग, उपस्थित केलेले प्रश्न, मांडलेले प्रस्ताव, संसदेतील उपस्थिती आणि एकूण दर्जेदार कामगिरीबद्दल हे पुरस्कार दिले जातात. म्हणूनच यंदाचा हा पुरस्कार कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांना जाहीर झाला आहे. लोकसभेतील कामकाजात डॉ. श्रीकांत शिंदे सहभागी होत असतात. आतापर्यंत अनेक महत्त्वाच्या आणि सर्वसामान्यांच्या दृष्टीने गरजेच्या मुद्द्यांवर डॉ. शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कल्याण लोकसभा मतदारसंघातही पायाभूत सुविधा उभारण्यापासून सर्वच टप्प्यांवर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेऊन त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.

२०१४ च्या लोकसभेत निवडून आलेले डॉ. श्रीकांत शिंदे हे तरुण खासदारांपैकी एक खासदार होते. २०१९ च्या निवडणुकीतही डॉ. श्रीकांत शिंदे मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ते सुपुत्र आहेत. संसद रत्न पुरस्कार मिळाल्यामुळे डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कामगिरीच्या शिरपेच्यात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेलाआहे.

# निवडणुका आल्या की दिव्याला पाणी वाढविल्याच्या घोषणा होतात...

## मग हे वाढलेले पाणी जाते कुठे?



## ठाकरेंच्या शिवसेनेच्या महिला संघटीका ज्योती पाटील यांचा हल्लाबोल

**पाणी समस्येमुळे दिव्यातील अनेक नागरिकांना आजही टँकरने पाणी विकत घ्यावे लागते**

**दिवा:-** दरवर्षी दिव्यात पाणी वाढवल्याची घोषणा सत्ताधारी लोक करतात मग वाढलेलं पाणी जातं कुठे? असा सवाल करत दिव्यात नागरिकांना टँकरने पाणी विकत का घ्यावे लागते असा प्रश्न ठाकरेंच्या शिवसे-नेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी उपस्थित केला आहे.

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिवा शहराला दहा एमएलडी पाणी वाढवून देण्याची घोषणा नुकतीच दिव्यात केली होती.त्याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी दिव्या-तील एका कार्यक्रमात करत दिवा शहराला पाणी वाढवून देण्याचे सांगितले होते.यावर बोलताना ज्योती पाटील यांनी सरकारला थेट प्रश्न विचारला आहे.मागील दोन वर्षात दिवा शहराला वाढीव पाणी देण्याच्या घोषणा अनेक वेळा झाल्या. दिवा शहराला दहा-दहा एमएलडी पाणी वाढवल्याच्या घोषणा किमान दोन वेळा करण्यात आल्या. मग हे वाढलेलं पाणी जातं कुठे?असा सवालही ज्योती पाटील यांनी केला आहे. दिव्यातील नागरिकांना आजही टँकरने पाणी विकत घ्यावे लागते.शिंदे गटाचे दिव्यातील नेते दिव्यातील ८०% जनतेला पाणी समस्या भेडसावत नसल्याचे सांगतात, मग दिव्यातील बहुसंख्य जनता टँकरने पाणी विकत का घेते?असा प्रश्न ज्योती

**मागील दोन वर्षात किमान तीन वेळा पाणी वाढविल्याच्या घोषणा झाल्या, मात्र पाणी टंचाई कायम असल्याचा ज्योती पाटील यांचा आरोप**

पाटील यांनी उपस्थित केला आहे. दिवा शहरात आजही पाणीटंचाई असून ज्या नागरिकांना पाणी मिळते ते पाणी पुरेसे नसून गरजेपुरतेही पाणी लोकांना मिळत नाही याकडे ज्योती पाटील यांनी लक्ष वेधले आहे. निवडणुका आल्या की दिवा शहराला पाणी वाढल्याच्या घोषणा होतात मात्र पाच वर्षे दिव्यातील जनतेला पाणी समस्येला सामोरे जावे लागते असा आरोप ज्योती पाटील यांनी केला आहे.पाणीटंचाईमुळे महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४ पान : २

www.diwanews.com

# मारहाण करणाऱ्या डॉक्टरावर कारवाई

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात झालेल्या मारहाण प्रकरणी महापालिका प्रशासनाने २४ तासात कारवाईचा बडगा उगारला आहे. संबंधित प्राध्यापक डॉक्टरांना तब्बल ३० दिवसांच्या सक्तीच्या रजेवर पाठवले. तसेच त्यांचा पदभार दुसऱ्या वरिष्ठ डॉक्टरांकडे सोपविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. अशाप्रकारे डॉ. बर्नवाल यांना केलेली मारहाण चांगलीच महागात पडली आहे.

## ३० दिवसांच्या सक्तीच्या रजेवर

ठामपाच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय संलग्न आहे. त्या महाविद्यालयात पदवी पूर्ण करणारे विद्यार्थी एक वर्षाच्या करारावर कळवा रुग्णालयात निवासी ज्युनिअर डॉक्टर म्हणून काम करतात. रुग्णालयातील बाह्य रुग्ण कक्षापासून ते अनेक कक्षांची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असते. अशाप्रकारे रुग्णालयातील दुसऱ्या मजल्यावरील शस्त्रक्रिया विभागात दोन निवासी ज्युनिअर डॉक्टर शुक्रवारी सेवा बजावत होते. त्यावेळी रुग्ण उपचारासाठी दाखल करण्यावरून त्यांचा प्राध्यापक डॉक्टर संजय बर्नवाल यांच्याशी वाद झाला. यातून डॉ. बर्नवाल यांनी त्यांना शिवीगाळ करत त्यातील एकाला मारहाण केली. या घटनेची माहिती मिळताच पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी रुग्णालय अधिष्ठातांना प्राथमिक अहवाल तत्काळ पाठविण्याचे निर्देश दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर डॉक्टर बर्नवाल यांना ३० दिवसांच्या सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली.

# कोपरीत इलेक्ट्रीक वायरींगला आग लागून घराचे नुकसान




**ठाणे:** कोपरी पूर्व आनंद नगर येथील झेंडे चाळीमधील एका घरातील इलेक्ट्रिक वायरींगला आग लागल्याची घटना शुक्रवारी दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेत घरातील फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, कपाट व प्लास्टिक साहित्य, तसेच घरातील इतर साहित्य जळून नुकसान झाले आहे. शिवाय आगीमुळे झालेल्या धुराचा २० वर्षीय रवी दळवी या तरुणाला श्वास घेताना त्रास होत असल्याने उपचाराकरिता जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर आगीवर अवघ्या अर्ध्या तासात नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.

असलेल्या झेंडे चाळीच्या पहिल्या मजल्यावरील रूम नं. १४४६ मध्ये आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अग्निशमन दल यांनी धाव घेतली. तर आग लागल्याने भाडेकरू अनिकेत दळवी यांच्या घरातील फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, कपाट व प्लास्टिक साहित्य, तसेच घरातील इतर साहित्य जळून नुकसान झाले आहे. तसेच आग लागून घरामध्ये धूर झाल्याने रवी दळवी यांना श्वास घेताना त्रास झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# पिसाळलेल्या बैलाला वेळीच घातले वेसण



**ठाणे :** नववर्षाचे स्वागत सर्वत्र सुरू असताना, मुंब्रातील अमृतनगर परिसरात रस्त्यावर वावरणारा बेवारस बैल अचानक पिसाळला. त्यामुळे सर्वत्र एकाच खळबळ उडाली. पिसाळलेल्या बैलाने रस्त्यावरून ये- जा करणाऱ्या नागरिकांची चांगलीच बोबडी वळाली होती. जवळपास तासाभराने त्या बैलाला वेसण घालण्यात ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात यश आले.



नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत सर्वत्र आनंद साजरा केला जात असताना, मुंब्रा अमृतनगर परिसरातील साईकृपा अपार्टमेंट समोर रस्त्यावरील बेवारस बैल अचानक सकाळच्या सुमारास पिसाळल्याची बाब स्थानिक नागरिकांच्या निर्दशनास आली. बैल पिसाळा ही गोष्ट मुंब्रा परिसरात वाऱ्यासारखी पसरली. याची माहिती मिळताच घटनास्थळी ठामपा कोंडवाडा विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. त्यानंतर बेवारस पिसाळलेल्या बैलाला त्या विभागाच्या कर्मचाऱ्यांना तासाभरात पकडले. त्यानंतर त्या बैलाला कोंडवाडा विभागाच्या ताब्यात देण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# खालसा कॉलेजची 'लोकर पार्लर' एकांकिका नमो चषकाची मानकरी

**ठाणे:** कोकण कला अकादमी आणि संस्कार आयोजित नमो चषक २०२३ ची अंतिम फेरी नुकतीच काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात पार पडली. अंतिम फेरीत खालसा कॉलेजची लोकल पार्लर ही एकांकिका सर्वोत्तम ठरली.

प्राथमिक फेरीतील २३ एकांकिकेमधून सात एकांकिका अंतिम फेरीसाठी निवडण्यात आल्या होत्या. सर्वोत्कृष्ट द्वितीय एकांकिका म्हणून संतोष क्रिएशनची आधी अधुरे या एकांकिकेला आणि तृतीय क्रमांक रंगवेढे मुंबई या संस्थेची लाडाची लेक या एकांकिकेला मिळाला. सर्वोत्कृष्ट एकांकिकेसाठी ३५ हजार रुपये आणि चषक, द्वितीय पारितोषिक २५ हजार रुपये आणि चषक तर तृतीय पारितोषिक १५ हजार रुपये अशी बक्षिसे विजेत्यांना प्रदान करण्यात आली. अंतिम फेरीचे परीक्षक म्हणून ज्येष्ठ अभिनेत्री मुक्ता गोडबोले, नेपथ्यकार संदेश बेंद्रे, श्रीनिवास नार्वेकर आणि प्रदीप वैद्य यांनी काम पाहिलेपारितोषिक वितरण समारंभास स्पर्धेचे आयोजक आमदार संजय केळकर माजी उपमहापौर सुभाष काळे कोकण कला अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. प्रा.प्रदीप ढवळ, प्रा. मंदारटिल्लू, विजय चावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कचऱ्याला लागलेल्या आगीत ४ दुचाकी पेटल्या

**ठाणे:** घोडबंदर रोडवरील मानपाडा येथील राय मास्टर कंपाउंडजवळ असलेल्या कचऱ्याला आणि बाईक सर्विस सेंटरच्या स्टोअर रूमला आग लागली. या आगीत सर्विसिंगसाठी आलेल्या ४ दुचाकीही पेटल्या असून त्यांचे नुकसान झाले आहे. जवळपास तासाभराने त्या आगीवर नियंत्रण आणण्यात यश आल्याची माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली. सर्विस सेंटरच्या स्टोअर रूमला आग लागल्याची माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळताच घटनास्थळी महावितरण, आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन दल या विभागांनी धाव घेत, आगीवर नियंत्रण मिळवले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४ पान : ३

www.diwanews.com



# रोनक ऍडव्हरटायजिंगचा तिसावा वर्धापन दिन जल्लोषात साजरा

**नवी मुंबई:-** जाहिरात क्षेत्रातील अग्रगण्य नाव म्हणून गेली तीस वर्षे रोनक ऍडव्हरटायजिंग आपली सेवा देत आहे. या क्षेत्रात आपला ठसा उमटविण्यासाठी या संस्थेचे संस्थापक अमरदीप सिंग यांचे कष्ट व दूरदृष्टी हि महत्वाची ठरली. या तीस वर्षांच्या सोनेरी क्षणानां साजरे करण्याकरिता वाशी येथील आयलीफ बँक्वेट येथे वर्धापन दिनाचे भव्य असे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कंपनीला शुभेच्छांचा वर्षाव करण्याकरिता शुभचिंतक उपस्थित होते.

रोनक ऍडव्हरटायजिंग चा प्रवास हा प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे. कारण २३ डिसेंबर १९९३ या रोजी अमरदीप सिंग यांनी डोळ्यात मोठे स्वप्न व विश्वास घेऊन केबल टीव्ही जाहिरातीचा व्यवसाय सुरु केला. वाशी प्लाझा या इमारती मध्ये चार बाय चार च्या कार्यालयातून सुरुवात करून त्याच इमारतीवर आपले पहिले होर्डींग लावले. यावरून ये सिद्ध होतं कि तुम चं एक व्यवसायातील पाहिलं पाऊल हे मोठया ध्येयाकडे घेऊन जातं. त्या साठी अथक परिश्रम व जिद्दीने तुम्ही आपलं स्वप्न सत्यात आणू शकता.

अमरदीप सिंग यांच्या व्यवसायातील दूरदृष्टी मुळे त्यांनी भविष्याची जाहिरात क्षेत्रातील संधी आधीच हेरली होती. म्हणूनच वृत्तपत्र जाहिरात, आऊटडोअर मीडिया आणि आता डिजिटल मीडिया सेवा पुरविण्यात ते प्रथम क्रमांकावर आहेत. त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे याची दखल घेत अनेक संस्थांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. या यशस्वी प्रवासात त्यांना त्यांची धर्मपत्नी टीना विग , रोनक सिंग विग आणि रेहत सिंग विग हे दोन सुपुत्र व त्यांचे कर्तव्य निष्ठ सहकारी यांची साथ लाभली.

रोनक ऍडव्हरटायजिंगच्या तिसाव्या वर्धापन दिनास शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, आमदार प्रशांत ठाकुर, शिवसेना (शिंदे) जिल्हाप्रमुख विजय चौगुले, माजी सभागृह नेते परेश ठाकूर , काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष डॉ. अनिल कौशिक, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजू भैया शिंदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे श्रीकांत हिंदळकर आणि इतर पक्षांचे नेते उपस्थित होते. तसेच मोहन गुरुनानी, भूपेन शाह, अतुल अग्रवाल, राजेश प्रजापति, मनीष भातिजा, प्रिया गुरुनानी, जिगर त्रिवेदी, वसंत बत्रा, चिराग शाह आणि नामांकित बिल्डर यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्यात. मनोरंजनासाठी गोल्डन हिट्स ऑर्केस्ट्रा च्या जुन्या नवीन गाण्यांचे सादरीकरण नामवंत गायकांच्या माध्यमांतून करण्यात आले.






# दिवा शहरात पार पडला खेळ पैठणीचा कार्यक्रम

**दिवा :** दिव्यातील मनसे शाखा अध्यक्ष सयाजीराव तुकाराम चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दिवा येथे महिलांसाठी होम मिनिस्टर.. खेळ पैठणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात महिलांना संजीवनी इंटरप्राईजेस राजेश गुरव आपला माणूस आणि सयाजीराव सरकार यांच्यामार्फत महिलांसाठी पाच मानाच्या पैठणी व छोटे-मोठे वीस बक्षीसे व कार्यक्रमास उपस्थित प्रत्येक महिलेस हळदी कुंकवाचे मान म्हणून भेटवस्तू देण्यात आली.

# नोकरदार महिलांसाठी जागरूकता अभियान शुभारंभ




## ठाणे महापालिका आणि कॉज फाऊंडेशन यांचा उपक्रम

ठाणे : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिका आणि कॉज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नोकरदार महिलांच्या सुरक्षेसाठी कायदेविषयक जागरूकता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी, माजी महापौर मीनाक्षी शिंदे, उपायुक्त वर्षा दीक्षित, आरोग्य अधिकारी आणि विशाखा समितीच्या डॉ. राणी शिंदे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, रेखा हिरे, ॲड. संध्या जाधव, ॲड. वैशाली रोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

'सुरक्षित शहर' होण्यासाठी सर्व नोकरदार महिला यांच्या सुरक्षेबाबत कॉज फाऊंडेशन कार्यरत आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक-शोषण झाल्यास अगर कौटुंबिक हिंसाचार झाल्यास 'सुरक्षित महिला (आयसीसी)' योजनेंतर्गत, महिलांना मदक उपलब्ध करून देण्यासाठी या अभियानाची माहिती ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय, अशासकीय आस्थापनांपर्यंत पोहोचवणे हे या अभियानाचे प्रयोजन असल्याचे कॉज फाऊंडेशनच्या संचालिका कल्पना जितेश मोरे यांनी सांगितले. कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या मार्गदर्शन कार्यक्रमात पालिकेतील महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. कॉज फाऊंडेशनचे अध्यक्ष जितेश मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४
पान : ४
www.diwanews.com

## ९ मीटर बॉक्स जळून खाक

**ठाणे:** मुंब्रा, शैलेश नगर परिसरातील अद्वैत या ४ मजली बिल्डिंगच्या तळ मजल्यावरती असलेल्या मीटर बॉक्स रूममध्ये आग लागली. या आगीत १६ मीटर बॉक्सपैकी ९ मीटर बॉक्स जळून खाक झाले आहे. ही घटना गुरूवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास समोर आली असून त्या आगीवर जवळपास तासाभराने नियंत्रण मिळविण्यात यश आले. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी टोरंट पॉवर विद्युत कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नसून ९ मीटर बॉक्स पुर्णतः जळून खाक झाल्याची माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



# अनधिकृत बांधकामांच्या विरोधात ठाणे महानगर पालिकेची धडक मोहीम

## १० जाने. ते १० फेब्रु.या काळात धडक कारवाई

**ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाईची धडक मोहीम १० जानेवारी ते १० फेब्रुवारी या काळात सलगपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. ही मोहिम संपूर्ण महापालिका क्षेत्रात राबविण्यात येणार असली तरी त्याचा विशेष भर कळवा, मुंब्रा आणि दिवा या भागावर राहणार आहे.**

शहरात कोणतेही अनधिकृत बांधकाम सुरू होऊ नये यावर सर्व सहायक आयुक्तांनी स्वतः लक्ष ठेवावे. अनधिकृत बांधकामांच्या विरोधातील मोहिमांचे संनियंत्रण सहायक आयुक्त करतील. आवश्यकतेप्रमाणे त्यांना अतिरिक्त अधिकाऱ्यांची कुमकही देण्यात येईल. अनधिकृत प्लिंथ (जोत्याचे बांधकाम) तात्काळ तोडण्यात यावे, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले आहे. पुन्हा त्याच ठिकाणी प्लिंथचे काम झाले तर जमीन मालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करावा. जमीन सरकारी मालकीची असेल तर बांधकाम करणाऱ्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच, एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर करावा, असेही आयुक्तांनी सांगितले.

बांधकामाच्या ठिकाणी बोअरवेल केली असेल तर ती तोडावी आणि त्यात दगड टाकून ती बोअरवेल कायमस्वरूपी बुजवावी. तसेच, तोडकामाचा सगळा खर्च हा जमीन मालकाकडून, त्याच्या मालमत्ता करात थकबाकी म्हणून वसूल करावा. डिमांड नोटीस काढून तो खर्च वसूल केला जावा, असेही आयुक्तांनी निर्देश दिले.

महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत मुख्यमंत्री यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. अनधिकृत बांधकाम म्हणजे नागरिकांच्या सुरक्षेलाही मोठा धोका असतो. त्यामुळे, आपापल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाचा आढावा घेवून तोडकामाचा कृती आराखडा तयार करावा. स्वतः साईटवर उभे राहून तोडकाम करून घ्यावे, असे आयुक्त श्री. बांगर यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना सांगितले. कारवाई करताना अधिकाऱ्यांनी सौजन्यपूर्ण वागावे. नागरिकांचे हित लक्षात घेवून ही कारवाई सुरू असल्याचे सांगावे. अनधिकृत इमारतीवरील कारवाई करताना पूर्ण बांधकाम जमीनदोस्त झाले पाहिजे. पूर्णपणे सुरक्षित वातावरणात ही कारवाई झाली पाहिजे. सहायक आयुक्त किंवा त्यावरील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच तोडकाम कारवाई झाली पाहिजे, असेही आयुक्तांनी अधिकाऱ्यांना सांगितले. ज्या इमारतीचे बांधकाम तोडले जात आहे ती पूर्ण जमीनदोस्त करण्यात यावी. केवळ स्लॅब तोडणे किंवा भिंती पाडणे म्हणजे अनधिकृत बांधकाम तोडणे नव्हे. मोठ्या इमारती जमीनदोस्त करण्यापूर्वी त्यांचे जिने पूर्णपणे तोडले जावेत, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

## कारवाई न करणाऱ्यांना निलंबित करणार

सहायक आयुक्त आणि परिमंडळ उपायुक्त यांना धडक मोहीम राबविण्यासाठी अतिक्रमण विभागाने पूर्ण पाठबळ द्यावे. आवश्यक असेल तिथे इमारत तोडकाम तज्ज्ञांची मदत घ्यावी. पाच मजल्यापेक्षा जास्त मोठे बांधकाम तोडण्यासाठी विशेष यंत्रणा, यंत्र सामुग्री उपलब्ध करून द्यावी, असेही आयुक्त श्री. बांगर म्हणाले. तसेच, एका प्रभाग समिती क्षेत्रात एकाचवेळी वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई केली जावी. रविवार वगळता सर्व दिवशी ही कारवाई होईल. त्याला सार्वजनिक सुटीच्या दिवसाचाही अपवाद असणार नाही, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त (अतिक्रमण) गजानन गोदेपुरे, परिमंडळ उपायुक्त शंकर पाटोळे, दिनेश तायडे, उपनगर अभियंता विनोद पवार, सर्व सहायक आयुक्त आदी उपस्थित होते.

### दिवा येथील बांधकामांना परवानगीसाठी व्यवस्था

**दिवा भागात विविध नियमांमुळे बांधकाम परवानगी देण्यावर बंधने आहेत. त्यामुळे, ज्यांना नियमित बांधकाम करायचे आहे त्यांना त्याकामी मदत व्हावी यासाठी शहर विकास विभागाने एक खिडकी योजना सुरू करावी. अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून अधिकृत बांधकामांना चालना देण्याच्या अनुषंगाने याचा उपयोग होईल, असे निर्देशही आयुक्त बांगर यांनी दिले.**

### जादा सुरक्षाबळ

**महाराष्ट्र सुरक्षा मंडळाकडून १०० जादा जवान घेण्यात येत आहेत. त्यासाठी आवश्यक खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. हे जवान शारिरीकदृष्ट्या सक्षम असतील आणि त्यात महिला व पुरुषांचे प्रमाण आवश्यकतेनुसार असेल, याची दक्षता घ्यावी, असेही आयुक्त श्री. बांगर यांनी सांगितले. सध्या तोडकाम करण्यासाठी एकच ठेकेदार आहे. मोठ्या प्रमाणावर धडक कारवाई करायची असल्याने जास्त ठेकेदार लागणार आहेत. त्याची निविदा प्रक्रिया तातडीने करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.**

### अनधिकृत नळ जोडणी मुख्य पाइपलाइन पासून तोडावी

**कळवा, मुंब्रा आणि दिवा या भागात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत नळ जोडणीच्या तक्रारी आहेत. त्या तोडण्यासाठी विभागनिहाय पथक स्थापन करावे. या अनधिकृत नळ जोडणी थेट मुख्य पाइपलाइन पासून तोडली जावीत. अनधिकृत पाणी जोडणी घेणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा. पाणी चोरी थांबली पाहिजे, असे आयुक्त बांगर यांनी सांगितले.**

### पाच दिवसीय प्रारंभ महोत्सवाची भव्य सांगता

# अभिनेता अक्षय वाघमारे व अभिनेत्री प्रीतम कागणे यांच्या उपस्थितीत यंग अचिव्हर्स अवार्ड प्रदान



**नवी मुंबई: राजीव गांधी कॉलेजचा प्रारंभ महोत्सव दरवर्षीप्रमाणे सुद्धा यावर्षी यशस्वी ठरला. खुर्ची या आगामी मराठी चित्रपटातील कलावंतांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची रंगत वाढवली.**

यावेळी फॅशन शो, गायन स्पर्धा व नृत्य स्पर्धेच्या अंतिम फेरी संपन्न झाल्यात. प्रारंभ कि कॅन्टीन मधून जो काही निधी हा नफ्याच्या स्वरूपात प्राप्त होणार आहे. तो या माध्यमातून एच आय व्ही एड्सग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक भवितव्यासाठी मदत तसेच थायलिशीन्याग्रस्त व कॅन्सरग्रस्तांना मदत म्हणून मुलांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी दिला जाणार असल्याचे राजीव गांधी कॉलेजचे प्राचार्य बासुकीनाथ पांडये यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले . प्रारंभ च्या पाच दिवसांमध्ये कलावंतांनी भेटी दिल्यात यामध्येअभिनेता अक्षय वाघमारे, अभिनेत्री प्रीतम कागणे, आर्यन हगवणे, श्रेया पासलकर व दिग्दर्शक शिव धर्मराज माने , निर्माता संतोष कुसुम हगवणे यांनी ‘‘प्रारंभ‘‘ महोत्सवाचे तोंड भरून कौतुक केले . राजीव गांधी कॉलेजचे संस्थापक डॉ. कुंवर हरिबंश सिंग यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्य प्राध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी विद्यार्थी व स्पर्धक यांचे कौतुक केले. माजी आमदार घनश्याम दुबे, गुलाब दुबे, कॉलेजचे प्रशासकीय अधिकारी टीपी सिंग, यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे पाहुणे व विजेत्यांचे स्वागत केले.

विविध स्पर्धांना परीक्षक म्हणून तबलावादक व गायक संजीव दोषी, निर्माता संदीप नगराळे, श्रीधर कराडे, सुरज बिरम्बोळे यांनी उपस्थिती दाखवली. यावेळेस भव्य दिव्य अशा मैदानावर अशोकपुष्प प्रकाशन चा यंग अचिव्हर्स पुरस्कार सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. गेली बारा वर्ष हा पुरस्कार सोहळा नवी मुंबईत संपन्न होत असतो यावर्षी हा मानाचा पुरस्कार माजी नगरसेवक व युवानेते करण मढवी, अभिनेत्री रूमा शर्मा, युवा उद्योजक करण गोगरी, अभिनेता व कोरिओग्राफर धर्मेश नायक, दिग्दर्शक ऐश्वर्यकुमार पाटकर, कीर्ती कुमार यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

---

### ठाणे महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी संकल्प संपूर्ण स्वास्थ्य उपक्रम

# ठाणे महानगरपालिका व इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडीयाट्रीक्स यांचा संयुक्त कार्यक्रम

**ठाणे:** दैनंदिन जीवनशैलीत थोडे बदल केले तरी आपण खूप आजारांना रोखू शकतो. त्याचीच माहिती देण्यासाठी देशभर विद्यार्थ्यांशी संवाद साधला जात आहे. ठाणे महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनाही त्याची माहिती देण्यासाठी ठाणे महानगरपालिका व इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडीयाट्रीक्स यांनी संयुक्तपणे संकल्प संपूर्ण स्वास्थ्य उपक्रम हाती घेतला आहे.

आपल्यासमोर जीवनशैलीशी निगडित आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यांचा सामना कसा करायचा याची माहिती शालेय स्तरावर पोहोचली पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांशी संवाद साधला जाणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडीयाट्रीक्स यांनी पुढाकार घेऊन संकल्प संपूर्ण स्वास्थ्य उपक्रम आखला आहे. त्याला महापालिका सर्वोतोपरी मदत करेल, असे प्रतिपादन ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांनी या उपक्रमाचे उद्घाटन करताना केले.

महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे शिक्षण विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात महापालिका शाळेतील आठवी आणि नववी इयत्तेमधील विद्यार्थी उपस्थित होते. महापालिका शाळांतील सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम टप्प्याटप्प्याने पोहोचवला जाणार आहे.

इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडीयाट्रीक्स संस्थेचे अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर यांनी या उपक्रमाचे प्रयोजन स्पष्ट केले. गेल्या दहा ते पंधरा वर्षात लहान मुलांच्या, युवकांच्या आरोग्याचे चित्र खूप बदलले आहे. हा बदल कशामुळे होतो आहे याचा शोध घेतल्यानंतर त्याची मुळे बदलती जीवनशैली, अन्न, राहणीमान यांच्यात असल्याचे दिसले. म्हणूनच थेट विद्यार्थ्यांशीच संवाद साधण्याचा निर्णय संस्थेने घेतला. विकसित भारताचे सुदृढ नागरिक बनवण्यासाठी हा संवाद आवश्यक असल्याचे मत डॉ. किंजवडेकर यांनी मांडले. याप्रसंगी, संस्थेचे महाराष्ट्र विभाग अध्यक्ष डॉ. रामगोपाल चेजरा, सहसचिव डॉ. परमानंद आंदनकर, उपायुक्त (शिक्षण) उमाकांत गायकवाड, शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे आदी उपस्थित होते.

उद्घाटन समारंभानंतर, ठाणे महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. १३०, काजूवाडी व माध्यमिक शाळा क्र. ५, सावरकर नगर येथील इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांशी बालरोगतज्ज्ञांनी विविध विषयांवर संवाद साधला. डॉ. उपेंद्र किंजवडेकर यांनी पोषण आहार आणि जंकफूडबाबत जागरूकता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. वैजयंती इंगवले यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या व्यायामाची प्रात्यक्षिके दाखविली. तसेच, विद्यार्थ्यांकडून ही प्रात्यक्षिके करून घेतली. डॉ. संदिप केळकर यांनी मानसिक आरोग्याची गुरूकिल्ली यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिके दाखविली. तर, डॉ. ग्रिविता रायकर यांनी विद्यार्थ्यांना स्क्रीन टाईम, मोबाईल, टि.व्ही. यांचा अतिवापर, नियमित झोप यांच्याबद्दल माहिती दिली. या सत्राचे समन्वयन डॉ. अमृता बाविस्कर यांनी केले.

उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षकांनी निरोगी आयुष्यासाठी 'जंकफूड ऐवजी हेल्दी फूड' अशी शपथ घेतली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी याबाबत या कार्यक्रमात मिळालेल्या मोलाच्या मार्गदर्शनानुसार आपल्या किमान १० मित्रमैत्रिणींना माहिती देण्याची ग्वाही दिली.

दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी
आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४
पान : ६
www.diwanews.com

## प्लास्टिक पाण्याच्या टाकीला आग

ठाणे: टेरेस वरती रिकामी ठेवण्यात आलेल्या प्लास्टिक पाण्याच्या टाकीला आग लागल्याची घटना सोमवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास समोर आली. ही घटना नौपाडा परिसरातील विष्णुनगर येथील यश आनंद सोसायटीत घडली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून आग नेमकी कशी लागली हे समजू शकलेले नाही. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, त्यांनी तातडीने आगीवर नियंत्रण मिळविले, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



# लाईफ लाईन ठरतेय डेथ लाईन

## गतवर्षात ३११ जणांचा मृत्यू, ११३ जण जखमी

**ठाणे : लाईफलाईन अशी ओळख असलेली मध्य रेल्वे सेवा प्रवाशांसाठी २०२३ या वर्षासाठी डेथलाईन ठरताना दिसून आली. रेल्वे अपघातात गेल्या वर्षभरात २६६ प्रवाश्यांचा अपघाती तर ४५ प्रवाश्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. तसेच ११३ प्रवासी जखमी झाले असून त्यामध्ये १०० पुरुष तर उर्वरित १३ महिला प्रवाशांचा समावेश असल्याची माहिती ठाणे लोहमार्ग पोलिसांनी दिली आहे.**

ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या हद्द ही ठाणे ते दिवा पुढे तळोजा आणि ऐरोली या रेल्वे स्थानका दरम्यान पसरली आहे. त्यातच, कोपरी ब्रिज, खाडी पूल, कळवा फाटक, रेतीबंदर, दिवा क्रॉसिंग सारख्या ठिकाणी रूळ ओलांडता काळजी घेणे आवश्यक आहे. मात्र घाईगडबडीत रेल्वेचा धक्का लागून, प्रवाश्यांना जीवास मुकावे लागत आहे. रेल्वेपुलाचा वापर करण्याचे सांगून देखील रूळ ओलांडताना शॉर्टकटचा फंडा काही प्रवासी अवलंबतात परंतु हा शॉर्टकट कधीही धोक्याचा ठरू शकतो. रेल्वे अपघाताच्या विविध घटनांत ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत जानेवारी ते डिसेंबर २०२३ या वर्षभरात २३८ पुरुष तर २८ महिलांचा प्रवाश्यांचा अपघाती मृत्यू झाला आहे. तर ४५ प्रवाश्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. तसेच रेल्वे अपघातात सुदैवाने काही प्रवासी वाचले असले तरी, जखमींमध्ये १०० पुरुष आणि १३ महिला प्रवाश्यांचा समावेश आहे.

सुरक्षित प्रवास हा रेल्वेचा असला तरी, या प्रवासात नियमांचे पालन करणे ही तितकेच आवश्यक आहे. लोकलच्या दरवाज्यातून बाहेर डोकावू नका, रूळ ओलांडू नका, रेल्वेपुलाचा वापर करा, धावती ट्रेन पकडू नका, आदी सूचना रेल्वेकडून दिल्या जातात. त्या कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे. त्यातच काही वेळा धावत्या लोकलमधून पडणाऱ्या प्रवाशांचे प्राण रेल्वे पोलिसांनी वाचवले आहेत. ''– पंढरी कांदे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे लोहमार्ग पोलीस)

## डॉ. शीतल नायर यांना एमिली डिकिंसन पुरस्कार
### श्री राम आणि सीता मातेवर रचली होती कविता

**ठाणे** : साहित्यिक व कवी डॉ. शीतल नायर यांनी श्री राम आणि सीता मातेवर रचलेल्या कवितेला अमेरिकन साहित्यात उत्तम प्रस्तुतीसाठी पोएट्री एसोसिएशन ऑफ अमेरिका द्वारे मान्यताप्राप्त एमिली डिकिंसन पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले आहे.

डॉ. नायर यांनी आत्तापर्यंत वेगवेगळ्या विषयांवर ६ पुस्तके लिहीली आहेत व हे त्यांचे सातवे पुस्तक आहे. फ़्लेम्स ऑफ़ डिज़ायर नावाने रचल्या गेलेल्या २१ कवितातांच्या ह्या कवितासंग्रहामध्ये श्रीराम आणि सीता मातेमधील प्रेमाबद्दल दिव्य प्रेम ह्या शीर्षकासह कविता रचण्यात आली आहे. ही कविता सॉनेट प्रकारात रचली गेली आहे. ह्या प्रकारची कविता सध्या अगदी थोडेच कवी रचत आहेत. कवितेला पोएट्री एसोसिएशन ऑफ अमेरिका द्वारे मान्यता मिळाली आहे व एमिली डिकिंसन पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे. हा पुरस्कार अमेरिकन साहित्य क्षेत्रातील मुख्य पुरस्कार आहे. ह्या कवितेद्वारे जय श्री रामचा नाद अमेरिकेमध्येही घुमणार आहे.

## रिव्हॉल्व्हरची साफसफाई करताना एक राऊंड फायर तिघे जखमी

**ठाणे:** रिव्हॉल्व्हरची साफसफाई करताना एक राऊंड फायर होऊन मोहम्मद उमर शेख (५०), बिपिन कुमार जगजीवन जयस्वाल (२१) आणि राहुल कुमार श्री शेखरपुरम जयस्वाल (२३) असे वागळे इस्टेट मधील तिघे जखमी झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरात समोर आली. जखमींना उपचारार्थ ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून हा प्रकार चुकून घडल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

जखमी शेख यांची वागळे इस्टेट परिसरातील राम नगर रोड नंबर २८ येथे चामुंडा फॅब्रिकेटर्स ही कंपनी आहे. त्या कंपनीच्या ठिकाणी शेख हे आपल्या परवाना असलेल्या रिव्हॉल्व्हरची साफसफाई करत असताना त्यांच्याकडून चुकून एक राऊंड फायर झाला. त्यामध्ये शेख यांच्यासह अन्य दोघे जखमी झाले असून तिघांच्या हाताला दुखापत झाली आहे. बिपीन कुमार आणि राहुल कुमार या दोघांना उपचारार्थ दाखल करण्यात आल्याची माहिती श्रीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांनी दिली.



## राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते 'ट्राय सर्व्हिसेस वेटरन्स डे'चा शुभारंभ

**मुंबई :** राज्यपाल रमेश बैस यांनी निळा झेंडा दाखवून ट्राय सर्व्हिसेस वेटरन्स डे चा शुभारंभ नरिमन पॉइंट येथे केला. त्यानंतर नरिमन पॉइंट येथे रोड शो करण्यात आला त्यामध्येही राज्यपाल सहभागी झाले. यावेळी 'भारत माता की जय' या घोषणांनी हा परिसर दुमदुमला. लष्कर, नौदल व वायुदल या तीनही दलातील सैन्यातील अधिकाऱ्यांनी देशासाठी दिलेल्या अतुलनीय कार्याची आठवण करून देवून,या शूरवीरांच्या कार्याची माहिती नव्या पिढीला होण्यासाठी ट्राय सर्व्हिसेस वेटरन्स डे हा आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगवगळ्या दिवशी साजरा केला जातो.

## वेरणा कारने चार दुचाकींना दिली धडक

**ठाणे:** तलावपाळी सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज समोर एका बाजूला उभ्या केलेल्या चार दुचाकींना भरधाव वेगाने जाणाऱ्या वेरणा कारने धडक दिली. या घटनेनंतर चालक पळून गेला आहे. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अपघात घडला असा प्राथमिक अंदाज वर्तवला आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व नौपाडा पोलीस धाव घेतली होती. यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नसून अपघातग्रस्त चालकाने मद्यप्राशन केल्याचे प्रत्यक्षदर्शिकडून सांगण्यात येत आहे. तर अपघातातील दोन दुचाकींची माहिती समजू शकलेली नाही अशी माहिती सूत्रांनी दिली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ८ जानेवारी २०२४
पान : ७
www.diwanews.com

## सेफ्टी नेटला आग

**ठाणे:** कोपरी पूर्व येथील सिद्धार्थ नगर सर्कल जवळ, उभारण्यात येत असलेल्या नवीन ब्रीज वरील सेफ्टी नेटला (जाळी) आग लागली. घटना सोमवारी मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत ती आग काही मिनिटात नियंत्रणात आणली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

.........

# दिवा स्थानकातील सरकत्या जिन्याचं शैलेश पाटील यांच्या हस्ते लोकार्पण





ठाणे:- दिव्यात शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे. यांच्या प्रयत्नांमुळे व दिवा रेल्वे प्रवासी संघटनेच्या मागणीनुसार झालेल्या दिवा स्थानकातील फलाट क्रमांक दोन वरील मुंबई दिशेकडील व कल्याण दिशेकडील सरकत्या जिन्याचं लोकार्पण उपशहर प्रमुख नगरसेवक शैलेश पाटील यांच्या हस्ते फित कापुन करण्यात आले. यावेळी उपशहर प्रमुख, दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष आदेश भगत, विभाग प्रमुख उमेश भगत, विभाग प्रमुख निलेश पाटील, उपविभागप्रमुख समीर पाटील, प्रदीप पाटील,नितीन ओतूरकर, शिवसैनिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# म्हाळगी व्याख्यानमालेत श्रोत्यांना विविध विषयांची वैचारिक मेजवानी - आमदार संजय केळकर

**ठाणे:** सालाबादप्रमाणे रामभाऊ म्हाळगी व्याख्यानमाला येत्या मंगळवार ९ जानेवारीपासून सुरू होणार असून १५ जानेवारी रोजी मकर संक्रांती दिवशी समारोप होणार आहे. यंदाचे व्याख्यानमालेचे ३८ वे वर्ष असून व्याख्यानमालेचे उद्घाटन केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. ''श्रीराम पूजा ते राष्ट्र पूजा ''या विषयावर त्यांचे भाषण होईल.

१० जानेवारीला शिवभक्त मोहन शेटे यांचे 'शिवरायांचा आठवावा प्रताप' यावर मार्गदर्शन होईल. ११ जानेवारीला रोजी 'देहातील महादेव' - एक जीवन प्रवास यावर डॉ. सुनिल काळे बोलतील. १२ तारखेला आर्टिफिशियल इंटोलिजन्स तज्ञ भूषण केळकर यांचे 'भविष्य व्यापणार तंत्रज्ञान' या विषयावर व्याख्यान होईल. १३ जानेवारी रोजी डॉ. अनिल मडके ''श्वासागणिक धोका वेळीच ओळखा'' यावर प्रबोधन करणार असून सुनिल कुलकर्णी हे १४ जानेवारी रोजी सद्य राजकीय परिस्थिती यावर भाषण करतील.

समारोपाच्या म्हणजेच १५ जानेवारीला सुप्रसिद्ध गायिका आरती अंकलीकर - टिकेकर यांची प्रकट मुलाखत माधुरी ताम्हणे घेतील. सदरची व्याख्यानमाला सरस्वती क्रिडा संकुल, मल्हार टॉकीज समोर, ठाणे येथे रोज रात्री. ८ वा. सुरू होईल. रसिक श्रोत्यांनी या ज्ञान प्रबोधन मनोरंजनाच्या यज्ञात अगत्याने यावे, असे व्याख्यानमालेचे अध्यक्ष संजय केळकर यांनी सांगितले आहे.



### ठाण्यात १२ जानेवारीपासून नमो चषक महोत्सव

**ठाणे :** येथील शहरात क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सव होणार असून विजेत्यांना नमो चषक दिला जाणार असल्याची माहिती ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी दिली. नमो चषक क्रीडा महोत्सवात क्रिकेट कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल कॅरम, बुद्धिबळ, १०० आणि ४०० मिटर धावणे, फुटबॉल, बॅडमिंटन आदी खेळांच्या स्पर्धा होणार असून यात १८ वर्षांवरील तरुणांना सहभागी होता येणार आहे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात या स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत. या स्पर्धा १२ ते २७ जानेवारी या काळात होतील.

# आधी दिवा स्थानकातून स्वतंत्र लोकल सुरू करा

## मग दिव्यासाठी मेट्रोचे गाजर दाखवा



### ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांचा मुख्यमंत्री शिंदेंना टोला

**दिवा:- आधी दिवा रेल्वे स्थानकातून दिवा वासियांसाठी स्वतंत्र लोकल सुरू करा आणि मग दिव्यातील नागरिकांना मेट्रोचे गाजर दाखवा असा हल्लाबोल ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांच्या घोषणेवर केला आहे.**

मुख्यमंत्र्यांनी दिवा येथे आयोजित एका कार्यक्रमात दिव्यासाठी मेट्रो सर्वेक्षण करण्याबाबतची घोषणा केली.हा निवडणूक जुमला असल्याचा आरोप रोहिदास मुंडे यांनी केला आहे.मेट्रोच्या घोषणे नंतर शिंदे गटाच्या दिव्यातील नेत्यांनी दिव्याला मेट्रो मिळणार अशी चर्चा सुरू केली. मात्र दिवा शहरातील लाखो नागरिकांना नीट लोकल प्रवास करायला मिळत नाही.जीव मुठीत घेऊन रेल्वे प्रवास करावा लागतो.लोकलमध्ये येथील नागरिकांना चढायला मिळत नाही. त्यामुळे अनेक वेळा अपघात होतात. गर्दीच्या वेळेला दिवा शहरातील नागरिकांना मुंबईच्या दिशेने जायलाही मिळत नाही.

दिवा स्थानकातून स्वतंत्र लोकल सीएसटीसाठी सुरू व्हावी अशी मागणी येथील लाखो नागरिकांची असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते, आणि दुसरीकडे निवडणुकांच्या तोंडावर दिवा शहरासाठी मेट्रोची गाजर दाखवली जातात असा हल्लाबोल ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी केला आहे.

दिवा शहरात आजही तीव्र पाणीटंचाई असताना दिव्यातील ८०% पाणीपुरवठा सुरळीत झाल्याची खोटी माहिती शिंदे गटाच्या दिव्यातील नेत्यांकडून दिली जात असून निवडणुकीच्या तोंडावर दहा एम एल डी पाणी वाढवण्याची घोषणा दरवर्षीप्रमाणे यावर्षी झाल्याचा आरोप रोहिदास मुंडे यांनी केला आहे. दिव्यातील जनतेला गृहीत धरण्याची मनसिकता शिंदे गटाची असल्याचे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.



# पत्रकार दिनी मोफत वैद्यकीय तपासणीला उदंड प्रतिसाद

### ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, ठाणे महापालिका आणि जिल्हा माहिती कार्यालयाचा विधायक उपक्रम

**ठाणे:** आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जाने. रोजी 'दर्पण' या वृत्तपत्राची सुरुवात केल्याने हा दिवस 'पत्रकार दिन' म्हणुन साजरा होतो. या पत्रकार दिनाचे औचित्य साधुन ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ , ठाणे महापालिकाआणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या पुढाकाराने शनिवारी,६ जानेवारी रोजी ठाणे महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केले होते.आधार रेखा प्रतिष्ठान, कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या शिबिरात अद्ययावत पध्दतीने १२१ जणांची मोफत वैद्यकिय तपासणी करण्यात आली.

ठामपा मुख्यालयात शनिवारी सकाळी १० वा. या कर्करोग तपासणी शिबिराचा प्रारंभ ठामपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी,ठामपा अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, संदीप माळवी, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे,ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, ज्येष्ठ संपादक दीपक दळवी, दिलीप शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, आधार रेखा प्रतिष्ठानच्या रश्मी जोशी आदीसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

या कर्करोग तपासणी शिबिरात पत्रकारांची रक्त तपासणी, नाक-कान- घसा तपासणी,स्त्रीरोग तज्ञांकडून स्त्रियांची तर तज्ञ फिजीशियनकडून पुरुषांची तपासणी आणि मुख्यत्वे: व्यसनासंबधी जागरूकता करण्यात आली. शिबिरातील प्रत्येक तपासणीचे रिपोर्टस लाभार्थींना देण्यात येणार आहेत. यावेळी मनपा आयुक्त बांगर यांनी, पत्रकार संघांने दोन्ही दिवस विधायक उपक्रम राबवुन उल्लेखनीय कामगिरी केल्याचे सांगुन पुढील काळात ठाणे महापालिकेतर्फेही महिला पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांची मोफत मॅमोग्राफी तपासणी करण्याच्या सुचना दिल्या. आज झालेल्या आरोग्य तपासणी शिबिरात ठाण्यासह कल्याण शहापूर मुरबाड येथील पत्रकारांनी सहभाग घेतला.